www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 321 मंगळवार दि. 05 ऑगस्ट २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514



**दैनिक युवक आधार** - काही दिवसांवर बहीण भाऊचे अतुट नाते निर्माण करणारा पवित्र असा रक्षाबंधन सण येवुन ठेपला आहे आपल्या लाडक्या भाऊरायाला राखी खरेदी करताना

# 'त्यांना अजिबात चिंता नाही की...

## डोनाल्ड ट्रम्प यांची भारताला धमकी, आयात शुल्क अजून वाढवण्याचा इशारा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर व्यापार आणि रशियन तेल खरेदीच्या मुद्द्यावरून दबाव वाढवला आहे. सोमवारी त्यांनी आपल्या सोशल मीडिया मंचावर ट्रुथ सोशलवर एक वादग्रस्त पोस्ट शेअर केली, ज्यामुळे भारत-अमेरिका संबंधांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी भारतावर गंभीर आरोप केले, ज्यात भारत रशियन तेल मोठ्या प्रमाणात खरेदी करत असून, ते खुले बाजारात नफ्यासह विकत असल्याचा दावा केला आहे. त्यांनी युक्रेनमधील युद्धाला रशियाच्या युद्ध यंत्रणांना भारताच्या तेल खरेदीमुळे बळ मिळत असल्याचेही म्हटले आहे. ट्रम्प यांनी भारताच्या आयात शुल्कात (टॅरिफ) मोठी वाढ करण्याची घोषणा केली.

ट्रम्प यांनी यापूर्वी ३० जुलै २०२५ रोजी भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५% टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती. याशिवाय भारताच्या रशियन तेल आणि लष्करी उपकरणांच्या खरेदीवरून त्यांनी एक अतिरिक्त 'पेनल्टी' लावण्याची धमकी दिली होती, ज्याचा तपशील त्यांनी अद्याप जाहीर केलेला नाही. नुकत्याच केलेल्या ताज्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी भारतावर हल्लाबोल करताना म्हटले की, "भारत रशियन तेल मोठ्या प्रमाणात खरेदी करतो आणि ते खुले बाजारात नफ्यासह विकतो. युक्रेनमध्ये रशियन युद्ध यंत्रणेमुळे किती लोकांचा जीव जात आहे याची त्यांना पर्वा नाही. त्यामुळे मी भारताला अमेरिकेत द्याव्या लागणाऱ्या टॅरिफमध्ये मोठी वाढ करणार आहे." या वक्तव्याने भारत आणि अमेरिकेतील व्यापार वार्तांना नवे वळण मिळाले आहे. ट्रम्प यांनी भारताला "मित्र" देश म्हटले असले, तरी त्यांनी भारताच्या उच्च आयात शुल्क आणि गैर-आर्थिक व्यापार अडथळ्यांवर टीका केली आहे. तसेच, भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल आणि लष्करी उपकरणे खरेदी करत असल्याचा आरोप करत युक्रेन युद्धाला बळ मिळत असल्याचा दावा केलाय.

**ट्रम्प यांचा दबाव भारताला रशियन तेलापासून परावृत्त करण्यासाठी**

ट्रम्प यांचे ताजे वक्तव्य आणि २५% टॅरिफचा निर्णय भारत-अमेरिका संबंधांवर तणाव निर्माण करणारा आहे. मात्र, भारताने आपल्या ऊर्जा धोरणात स्वायत्तता कायम ठेवली आहे आणि रशियन तेल खरेदी सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. भारत सरकार आणि तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, या टॅरिफचा अर्थव्यवस्थेवर मर्यादित परिणाम होईल, आणि भारत आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलेल. ट्रम्प यांचा हा दबाव भारताला रशियन तेलापासून परावृत्त करण्यासाठी असला, तरी भारताने आपली स्वायत्तता आणि आर्थिक स्थैर्य कायम ठेवण्याचे ठरवले आहे. येत्या काळात भारत आणि अमेरिकेतील व्यापार वार्ता आणि रशियन तेलाच्या मुद्द्यावर काय घडामोडी घडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**1) ट्रम्प यांनी कोणता टॅरिफ लावण्याची घोषणा केली आहे?**

ट्रम्प यांनी ३० जुलै २०२५ रोजी भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५% टॅरिफ लावण्याची घोषणा केली. याशिवाय, भारताच्या रशियन तेल आणि लष्करी उपकरणांच्या खरेदीवरून त्यांनी एक अतिरिक्त 'पेनल्टी' लावण्याची धमकी दिली, ज्याचा तपशील अद्याप जाहीर केलेला नाही.

**2) या टॅरिफचा भारतावर काय परिणाम होईल?**

भारतीय सरकारी सूत्रांच्या मते, २५% टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होणार नाही. यामुळे भारताच्या जीडीपीला ०.२% पेक्षा जास्त नुकसान होण्याची शक्यता नाही. भारत सरकार या टॅरिफच्या परिणामांचा सविस्तर अभ्यास करत आहे आणि राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलणार आहे.

**3) भारत आणि अमेरिकेतील व्यापाराची सध्याची स्थिती काय आहे?**

वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये भारत आणि अमेरिकेतील एकूण व्यापार १३१.८४ अब्ज डॉलर इतका होता. यात भारताला अमेरिकी बाजारात ४१.२ अब्ज डॉलरचा व्यापारी अधिशेष मिळाला. अमेरिकेच्या मते, त्यांचा भारतासोबत ४५.८ अब्ज डॉलरचा व्यापारी तूट आहे, ज्यामुळे ट्रम्प यांनी टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे.


# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

### भरघोस रक्कमेची पारितोषिके; सर्वोत्कृष्ट भजनी मंडळाला ५१ हजार रुपये बक्षिस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दिनांक २३ व दिनांक २४ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणारी हि स्पर्धा 'पुरुष खुला गट' आणि 'महिला खुला गट' अशा दोन गटात होणार असून प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट आहे. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.



भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्प्यात होणार असून प्राथमिक फेरी ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहे. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळींना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल. प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ ९१६७४७४५०७ या नंबरवर व्हॉट्सअप करावा. तसेच सदर व्हिडिओ आणि मंडळाची माहिती अर्थात मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी. अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी ६ जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा.अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे. त्यामध्ये श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक असणार आहे. सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संतांचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत ग्राह्य नाहीत) तसेच अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये. निवड झालेल्या मंडळींनी अंतिम फेरीसाठी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये भजन मंडळांनी स्वतःची आणावी. त्यामध्ये तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण असावेत. प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल तसेच परीक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असणार आहे. तसेच स्पर्धेतील गायक, वादक, चकवा, वादक किंवा कोणतेही कोरस दुस-या मंडळात सहभागी होवू शकणार नाही. त्याचबरोबर भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख पेहराव असावा, अशी स्पर्धेची नियमावली असून अधिक माहितीसाठी सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा- ७७१५८३५४२४, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५, चंद्रकांत मने ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे - ९३२६८१२१९६, पुनमताई ठाकूर ७२०८७७६००५, पवन राजे - ९२२१०९७३३७, अनिल कोळी - ९१६७४७४५०७, किंवा मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३० यांच्याशी संपर्क साधावा तसेच रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## लोकप्रिय आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये शास्त्रीय आणि सुगम संगीताची मैफिल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, नादब्रम्ह साधना मंडळ खारघर आणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक ०५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ०५ वाजता पनवेलमध्ये 'शास्त्रीय व सुगम संगीत सुश्राव्य मैफिल आयोजित करण्यात आली आहे.



या मैफिलीत सायंकाळी ५ वाजता पं. मारुती पाटील (ठाणे) यांचे सतारवादन होणार असून त्यांना तबल्यावर पं. विनायक नाईक (डोंबिवली) यांची साथ लाभणार आहे. त्यानंतर नवदुर्गा महिला प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांचे संगीत भजन होणार आहे. त्यामध्ये शिवमाला पाटील यांचे गायन होणार असून पखवाजवर निलेश पाटील, तबल्यावर मिलिंद कडू, चालक म्हणून नवदुर्गा महिला भजन मंडळाची साथ संगत असणार आहे. त्यानंतर सायंकाळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आयोजकांच्यावतीने अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक अक्षय चौधरी यांनी केले आहे.

## मराठी भाषा फाऊंडेशन वर्गातील शिक्षकांचे प्रश्न ऐरणीवर; शिक्षकांना न्याय देण्याची हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनची मागणी!

### "अल्पसंख्याक अमराठी शाळांमध्ये कार्यरत मानसेवी शिक्षकांचा आवाज बुलंद"

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर :**

अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागांतर्गत अल्पसंख्याक अमराठी शाळांमध्ये कार्यरत मराठी भाषा फाऊंडेशन वर्ग शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी राज्य सरकारकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या १५ वर्षांपासून राबविण्यात येणारी ही योजना केंद्र सरकारच्या पंतप्रधान अल्पसंख्याक कल्याणाच्या १५ कलमी कार्यक्रमाचा भाग असून, इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकविण्याचे कार्य हे शिक्षक करत आहेत. मात्र, त्यांच्या अडचणी, सेवा अटी व वेतन आदी प्रश्न आजही तसचेच असल्याने ते न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

**शिक्षकांच्या प्रमुख मागण्या अशा आहेत:**

1. 180 पटसंख्येची अट शिथिल करण्यात यावी.
2. गेल्या 12–15 वर्षांपासून सेवा देणाऱ्या शिक्षकांना सेवा संरक्षण मिळावे.
3. विद्यमान ₹5000 मानधन वाढवून किमान ₹20000 करण्यात यावे व ते नियमित मिळावे.
4. 9 महिन्यांच्या ऐवजी 12 महिन्यांची नियुक्ती करून सेवेत कायम करण्यात यावे.
5. संबंधित विभागाने या शिक्षकांशी बैठक घेऊन ठोस निर्णय घ्यावा.



ही मागणी माणिकराव कोकाटे (अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री), माधुरी मिसाळ (राज्यमंत्री) व प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग) यांच्याकडे सादर करण्यात आली आहे. यासोबतच शिक्षण आयुक्त, पुणे व शिक्षण संचालक (योजना) यांना कार्यवाहीसाठी निवेदन पाठविण्यात आले आहे.

*प्रतिक्रिया*

"या शिक्षकांचा प्रश्न केवळ वेतनाचा नाही, तर त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना स्थैर्य व न्याय देण्याचा आहे,"

**शेख अब्दुल रहीम**
संस्थापक अध्यक्ष : हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन
राज्य प्रवक्ता : महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन



# आदर्श शिक्षक कांतीलाल गर्जे यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती

## शिक्षकी जीवनाचा तेजस्वी अध्याय पूर्णत्वाकडे

"शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असतो," ही ओळख ज्या व्यक्तिमत्त्वावर सार्थ ठरते ते म्हणजे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, अंभोरा येथील आदर्श शिक्षक कांतीलाल आबासाहेब गर्जे सर. वयाच्या केवळ 51व्या वर्षी त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारून आपल्या 32 वर्षांच्या गौरवशाली शिक्षकी जीवनाचा अर्थपूर्ण शेवट केला आहे.

त्यांचा सेवानिवृत्ती समारंभ मंगळवार, 4 ऑगस्ट 2025 रोजी मोरया मंगल कार्यालय, सुलेमान देवळा येथे मोठ्या उत्साहात आणि भावनांनी भरलेल्या वातावरणात पार पडत आहे.

ज्ञानदानाची सुरुवात आणि प्रवास



कांतीलाल गर्जे सरांचा शिक्षकी प्रवास हा फक्त नोकरीचा प्रवास नव्हता, तर तो एक जीवनमिशन होता. अवघ्या 19 व्या वर्षी त्यांनी शिक्षकी सेवा स्वीकारली. 18 ऑक्टोबर 1993 रोजी मातकुळी केंद्रातील चिंचपूर येथून त्यांनी आपल्या कार्याचा श्रीगणेशा केला.चिंचपूर (मातकुळी) येथे 11 वर्षे, शिंदे वस्ती (जामगाव) येथे 8 वर्षे पारडी येथे 6 वर्षे आणि शेवटी अंभोरा शाळेत 7 वर्षांचा कार्यकाळ,या प्रत्येक ठिकाणी त्यांनी नुसतेच अध्यापन केले नाही, तर विद्यार्थ्यांच्या जीवनात अमूल्य संस्कारांची शिदोरी भरली.

संवेदनशील शिक्षक, सजग समाजसेवक

कांतीलाल गर्जे सर यांचा शाळेतील वावर हा नेहमीच सर्जनशील, प्रेरणादायी आणि शिस्तबद्ध असायचा. विद्यार्थी, सहकारी शिक्षक, ग्रामस्थ यांच्या मनात त्यांनी आपले अतूट स्थान निर्माण केले. त्यांनी फक्त पुस्तकातील ज्ञान दिले नाही, तर विद्यार्थ्यांना जगण्यासाठी आवश्यक जीवनमूल्ये शिकवली.

त्यांचे मनमिळावू आणि संयमी स्वभाव, शांत व संयमित नेतृत्व, सामाजिक बांधिलकी, आणि कार्यावरील निष्ठा यामुळे त्यांना शिक्षकांच्या पलीकडे जाऊन मार्गदर्शक, सल्लागार, समाजसेवक आणि मित्र ही ओळख प्राप्त झाली

एक प्रेरणादायी ठेवा

त्यांच्या शिक्षकी कारकीर्दीतून हजारो विद्यार्थी घडले, अनेक शिक्षकांनी प्रेरणा घेतली, अनेकांनी शिक्षणाच्या क्षेत्राकडे वेगळ्या नजरेने पाहायला शिकले. त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श ठेवून अनेक शिक्षकांनी आपले शिक्षणकार्य अधिक प्रभावी बनवले.

त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही त्यांची शिकवण, संस्कार, अनुभव हे नवीन पिढीसाठी एक अमूल्य ठेवा ठरणार आहेत.

शब्दात न मावणारे योगदान

गर्जे सरांचा सेवाप्रवास म्हणजे कर्तव्यपरायणतेचा शिखर, संवेदनशीलतेची मूर्ती, आणि मुलांवरील प्रेमाची साक्षात अनुभूती आहे. त्यांच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामध्ये त्यांचा वाटा हा स्पष्टपणे जाणवतो. आज अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वी ठरलेत, याचे श्रेय त्या माणसाला जाते ज्याने त्यांच्या आयुष्यात शिक्षणाची आणि प्रेरणेची पहिली ठिणगी पेटवली – कांतीलाल गर्जे सर.

शुभेच्छांचा वर्षाव

त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे. सोशल मिडिया, ग्रामसभा, शिक्षक संघटना, पालक आणि माजी विद्यार्थी यांच्यातून त्यांच्याविषयी प्रेमाने आणि आदराने भरलेले शब्द ऐकायला मिळत आहेत. हेच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

मनःपूर्वक वंदन आणि भावी वाटचालीस शुभेच्छा! कांतीलाल आबासाहेब गर्जे सर यांना त्यांच्या तेजस्वी, समर्पित, आणि अनुकरणीय शिक्षकी सेवेसाठी कृतज्ञतापूर्वक वंदन. पुढील आयुष्यात त्यांना उत्तम आरोग्य, समाधान, आणि नव्या प्रेरणांनी भरलेले दिवस लाभावेत, हीच प्रार्थना!

"एक आदर्श शिक्षक निवृत्त होतो, पण त्याचा आदर्श कधीच निवृत्त होत नाही.

***शब्दांकन -पत्रकार बाळासाहेब रकटाटे***
***9404258799***

# एचआरडी अँटवर्प आणि भारत रत्नम् मेगा सीएफसी यांची भागीदारी

## आयआयजेएस प्रीमियर 2025 प्रतिष्ठित प्रदर्शनादरम्यान भागीदारी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी**

४ ऑगस्ट २०२५ : हिरे आणि दागिन्यांच्या ग्रेडिंग, शिक्षण आणि उपकरण क्षेत्रातील युरोपमधील आघाडीची संस्था एचआरडी अँटवर्प हिने मुंबईतील भारत रत्नम् मेगा सीएफसी (सामायिक सुविधा केंद्र) येथे आपल्या कार्याची अधिकृत सुरुवात केली आहे. ही भागीदारी आयआयजेएस प्रीमियर 2025 या प्रतिष्ठित प्रदर्शनादरम्यान जाहीर करण्यात आली असून, भारताच्या दागिन्यांच्या क्षेत्रात जागतिक दर्जाच्या हिरे प्रमाणीकरण सेवांच्या माध्यमातून एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. उद्घाटन समारंभाला भारत रत्नम् मेगा सीएफसीचे सीईओ श्री.रवी मेनन, एचआरडी अँटवर्पचे ग्लोबल मार्केटिंग, विक्री व




शिक्षण संचालक श्री. टॉम नीस, आणि एचआरडी अँटवर्प इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रामकांत मिटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला उद्योगातील अनेक प्रमुख नेते, उत्पादक, विक्रेते आणि मेगा सीएफसीच्या मंडळ सदस्यांचीही उपस्थिती होती. मुंबईच्या समृद्ध हिरे आणि दागिन्यांच्या व्यवसायिक केंद्रस्थानी स्थित, नव्याने स्थापन केलेली ही सुविधा नैसर्गिक तसेच प्रयोगशाळेत निर्मित अशा हिऱ्यांसाठी आणि दागिन्यांसाठी संपूर्ण प्रमाणपत्र सेवा प्रदान करते. मेगा सीएफसीमध्ये एचआरडी अँटवर्पच्या सेवांचा समावेश झाल्यामुळे गुणवत्तेचे मानदंड उंचावले जातील, जागतिक स्पर्धात्मकता वाढेल आणि भारतात तयार झालेले हिरे व दागिन्यांवरील विश्वास अधिक दृढ होईल. श्री.रवी मेनन, सीईओ, भारत रत्नम् मेगा सीएफसी म्हणाले,"भारत रत्नम् मेगा सीएफसी ही कल्पना भारतीय उत्पादकांना सर्वोत्तम तंत्रज्ञान आणि तज्ज्ञतेच्या माध्यमातून स्पर्धात्मक वाढ मिळवून देण्याच्या दृष्टीने मांडण्यात आली होती. आमच्या व्यवसायिक परिसंस्थेत एचआरडी अँटवर्पची उपस्थिती ही आमच्या दृष्टीकोनाची पूर्तता करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो." श्री.टॉम नीस, ग्लोबल मार्केटिंग, विक्री व शिक्षण संचालक, एचआरडी अँटवर्प म्हणाले,"भारत हा जागतिक हिरे व दागिने उद्योगातील एक अत्यंत प्रभावशाली देश आहे. या भागीदारीच्या माध्यमातून, एचआरडी अँटवर्प भारतीय उत्पादक व निर्यातदारांच्या व्यापक वर्गापर्यंत आमची अचूक ग्रेडिंग व विश्वासार्हतेची परंपरा पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे." श्री.रामकांत मिटकर, व्यवस्थापकीय संचालक, एचआरडी अँटवर्प इंडिया म्हणाले,"भारत रत्नम् मेगा सीएफसीमध्ये आमची उपस्थिती ही केवळ निर्यातदारांसाठी ॲक्सेस निर्माण करणारी नसून, एमआयडीसीसह परिसरातील स्थानिक ग्राहकांसाठीही त्यांचे दागिने थेट ग्रेडिंगसाठी सादर करणे अधिक सोपे करते. आमच्या सेवा भारतभर अधिक सुलभ व पोचवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. लॅबमध्ये तयार झेलेल्या डायमंड्सच्या वाढत्या ट्रेंडच्या पार्श्वभूमीवर, एचआरडी अँटवर्प अंतिम ग्राहकांना त्यांच्या दागिन्यांच्या अस्सलतेबाबत जागरूक व शिक्षित करण्यासाठी कटिबद्ध आहे."

# वरखेडी नगरीत आहिरे परिवारातर्फे कानबाई मातेची भव्य मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न.

## मोहन ब्रँड चे संचालक मालक व पुर्ण टिम याचा चे वरखेडी नगरीत ग्रामस्थ मंडळी कडुन मोठ्या उत्साहात सत्कार

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी| समाधान पाटील**

एरंडोल तालुक्यातील वरखेडी नगरीत 4 ऑगस्ट रोजी कानबाई मातेची मोठ्या उत्साहात सोहळ्यानिमित्त वरखेडी नगरीत भव्य मिरवणूक काढण्यात आली असताना अभुतपुर्व प्रतिसाद वरखेडी नगरीतील ग्रामस्थ मंडळी व अहिरे परिवार लाभला. व कानबाई मातेची




नामाचा गजर करत शेकडो वरखेडी नगरीतील ग्रामस्थ मंडळींनी रामलाल रामकृष्ण पाटील यांच्या घरापासून सकाळी आठ ते साडे आठ यावेळेत कानबाई मातेची प्रतिमेचे पूजन ग्रामस्थ व अहिरे परिवार व भक्तगणांकडून करण्यात आली, त्यानंतर नऊ ते दहा पर्यंत कानबाई मातेची गितांचा व गजर, दहा वाजता भगव्या गावातु मोहन ब्रँड यांच्या गजरसह पुर्ण वरखेडी नगरीत मोठ्या संख्येने गावातील भाविक भक्तांनी कानबाई मातेची मुर्ती डोक्यावर घेऊन सजवून मोठ्या थाटामाटात संपूर्ण गावामध्ये मोहन ब्रँड च्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. कानबाई मातेची मोठ्या उत्साहात घोषणा देत लहान थोर मंडळी मोठ्या उत्साहात सहभागी झाले. याप्रसंगी गावातील सर्व महिला मंडळ मोठ्या संख्येने कानबाई मातेच्या उत्साहा मध्ये सहभागी झाले सदर कार्यक्रमांत वरखेडी नगरीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्तनपान सप्ताह विशेष स्तनपान जागरूकतेकरिता मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने 'फन-फिल्ड बेबी शॉवर'

## मनोरंजनात्मक खेळांबरोबरच स्तनपानाविषयी दिले प्रशिक्षण

दैनिक युवक आधार
नवी मुंबई

दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट हा जागतिक स्तनपान आठवडा म्हणून साजरा केला जातो. याचा उद्देश मातांना स्तनपानाच्या महत्वाविषयी जागृत करणे हा आहे. यानिमित्ताने खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने २० हून अधिक गर्भवती जोडप्यांसाठी एक विशेष बेबी शॉवर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये मनोरंजनाक्मक खेळ, जागरुकता आणि स्तनपानाचे महत्व पटवून देणाऱ्या जनजागृती सत्राचा समावेश होता. याठिकाणी मातृत्वाच्या संकल्पनेवर आधारीत फोटो बूथ देखील उपलब्ध करुन देण्यात आले होते. या कार्यक्रमाला डॉ. अनुरंजिता पल्लवी, डॉ. कल्पना गुप्ता, डॉ. हिमानी गुप्ता यांचा विशेष सहभाग होता.



गर्भधारणेच्या प्रवासात येणाऱ्या भावनिक आणि शारीरिक आव्हानांची ओळख करून देत मेडिकव्हर हॉस्पिटलने हा एक अनोखा उपक्रम आखला होता. जो केवळ मनोरंजनात्मकच नाही तर स्तनापानाचे प्रशिक्षण देत गर्भवती मातांना शारीरीक व मानसिकदृष्ट्या सक्षम करणारा होता. याठिकाणी उपस्थित जोडप्यांनी कपल गेम्समध्ये सहभाग घेत या कार्यक्रमाचा आनंद लुटला. गर्भधारणेच्या प्रवासातील या विशेष आठवणी टिपण्यासाठी विशेष फोटो सत्र देखील याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित स्तनपान प्रशिक्षण सत्रात स्तनपानासंबंधी असलेले प्रश्न व शंकांचे निरसन करण्यात आले. नवमातांना या काळातही फॅशनेबल कसे राहता येईल याविषयी याठिकाणी काही टिप्स देण्यात आल्या. *डॉ. तन्मेष कुमार साहू( नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयू प्रमुख ) सांगतात की,* स्तनपान हा नवजात शिशुच्या आरोग्याचा मुख्य पाया आहे. स्तनपानाने बाळाला आवश्यक पोषक तत्व आणि अँटीबॉडीज प्रदान करते जे संक्रमणांशी लढण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती विकसित करण्यास मदत करते. आईसाठी स्तनपान हे प्रसूतीनंतर लवकर बरे होण्यास मदत करते, गर्भधारणेदरम्यान वाढलेले वजन नियंत्रित राखण्यास मदत करते आणि स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाचा धोका कमी करते. प्रसुतीनंतर पहिल्या सहा महिन्यांकरिता विशेष स्तनपान करणे अधिक गरजेचे आहे आणि त्यानंतर दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ स्तनपान सुरु ठेऊन त्यानंतर हळूहळू बाळाची स्तनपानाची सवय सोडण्यास सुरुवात करता येते. हे केवळ पोषण नाही तर ते भावनिक आणि शारीरिक विकासाला देखील गती देते व आई आणि बाळाचे नाते आणखी घट्ट करते. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये उपचार यांच्या पलीकडे जाऊन मानसिक व शारीरीक आरोग्याची विशेष काळजी घेतली जाते. गर्भधारणेच्या प्रवासाला न घाबरता त्या प्रवासाचा आनंद कसा घेता येईल यासाठीच बेबी शॉवरसारख्या उपक्रमांचे आयोजन करत या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच जनजागृती देखील करण्यात आली. आम्ही सुरुवातीपासूनच पालकांना त्यांच्या पालकत्वाच्या प्रवासात पाठिंबा देत एक मजबूत, निरोगी कुटुंब तयार करण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करत राहू असे मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी स्पष्ट केले.

# इंडीयन ऑईल अधिकरी व मत्सव्यवसाय अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा पणाने घेतला जिव.

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

दि. २६ जुलै रोजी करंजा येथील समुद्रात ३ मच्छीमार कामगारांचा अपघाती मृत्यू झाला,

१. हेमंत बळीराम गावंड ४५/ रा. आवरे ता. उरण.
२. संदीप तुकाराम कोळी, वय ३८ रा.करंजा ता. उरण.
३. रोशन कोणी वय. ३९ रा.करंजा ता. उरण.



जिल्हा आपत्ती अधिकारी यांनी सायं, ८ वा. कळविल्याप्रमाणे इंडीयन कोस्ट गार्ड स्टेशन मूरूड जंजीरा यांना कळविण्यात आले असून तक्रार दाखल करून घेण्यात आली आहे.

मासेमारी बंद असताना देखील बोटी समुद्रात मासेमारी करीता दाखलकरण्यात आल्या यात मत्सव्यवसाय अधिकारी व इंडीयन ऑईल चे अधिकारी यांनी संगनमताने बेकायदेशीर रित्या इंधन पूरवून बोटी मासेमारी करण्याकरीता पाठवण्यात आल्या. असा दावा स्थानिकांकडून करण्यात आला आहे.

ही माहीती मिळताच शिवसेना नेते खा. श्री अनिल देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली मा. आयुक्त मत्सव्यवसाय, महाराष्ट्र श्री किशोर सदाशिव तावडे यांना शिवसेना नाविक सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. यात मत्सव्यवसाय अधिकारी व इंडीयन ऑईल च्या निष्काळजी पणामूळे हा अपघात घडल्याचा दावा करण्यात आला. यात इंडीयन ऑईल अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी व मृत व्यक्तीच्या कुटूंबाला नूकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना नाविक सेनेच्या शिष्टमंडळाकडून करण्यात आली. या प्रसंगी सरचिटणीस श्री बाळा लोकरे , प्रविण गायकवाड,प्रविण घाग, उपाध्यक्ष जसप्रितसिंग वढेरा, रणजीत कदम, भूषण सांगळे, चिटणीस रितेश सावंत, राज माढे व शिव सहकार सेनेचे पदाधीकारी विजय चपटे उपस्थित होते.







# बीड जिल्ह्यातून सहा महिन्यात ५३ अल्पवयीन मुली बेपत्ता;

## पालक वर्ग चिंतेत, प्रशासनाची कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**




बीड – बीड जिल्ह्यातील सामाजिक सुरक्षेवर मोठा प्रश्न निर्माण करणारी धक्कादायक माहिती समोर आली आहे. मागील सहा महिन्यांमध्ये जिल्ह्यातून तब्बल ५३ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. ही संख्या दिवसेंदिवस वाढत असून, या घटनेमुळे पालकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.जिल्ह्यातून एकूण १३८ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची नोंद आहे. त्यातील काही मुली परत आल्या असल्या तरी ५३ मुली अजूनही गायब आहेत. या प्रकरणात अनेक ठिकाणी प्रेमसंबंध, लग्नाचे आमिष, कामाचे आमिष यांचा वापर करून मुलींना पळवून नेले जात असल्याचे समोर आले आहे. काही प्रकरणात ही मुले राज्याबाहेर घेऊन गेल्याचेही आढळले आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने मुलींसाठी समुपदेशन कार्यक्रम संपन्न

## अध्यक्ष मंदार दोंदे यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने करण्यात आले होते आयोजन

दैनिक युवक आधार
पनवेल(प्रतिनिधी)

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने आज (दि. ४) पनवेलच्या पीर करम अली शहा उर्दू प्राथमिक शाळेतील मुलींना "गुड टच - बॅड टच" या अत्यंत संवेदनशील विषयावरती समुपदेशन करण्यात आले. माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे आणि सायकॉलॉजिस्ट अनिशा कोल्हापुरे या दोन निष्णात वक्त्यांनी मुलींना मार्गदर्शन केले. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे यांच्या माध्यमातून आजपर्यंत तब्बल ७० हजार विद्यार्थिनींना "गुड टच - बॅड टच" तसेच मुलींच्या लैंगिक समस्या, करियर कौन्सिलिंग या विषयावर समुपदेशन करण्यात आले आहे. सायकॉलॉजिस्ट अनिशा कोल्हापुरे यादेखील अत्यंत सोप्या शब्दांमध्ये हा क्लिष्ट विषय उलगडून दाखवतात. सदर समुपदेशन कार्यक्रम पहिली ते आठवीच्या मुलींकरता आयोजित करण्यात आला होता. तब्बल १४२ विद्यार्थिनींनी यावेळी तज्ज्ञांसोबत संवाद साधला. सुरुवातीला थोड्याशा बुजलेल्या मुलींनी नंतर उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



सल्लागार माधव पाटील यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मंदार दोंदे यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच एका अत्यंत गरज असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. मुख्याध्यापिका नाझीया सायरा युसुफ दळवी यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचातील उपस्थित सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. यावेळी तिसरीच्या विद्यार्थिनींनी अप्रतिम हस्तकलेतून निर्माण केलेल्या कागदी फुलांचे पुष्पगुच्छ सन्माननीय सदस्यांना प्रदान करण्यात आले. मुलींसाठी अत्यंत गरजेच्या असणाऱ्या समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी पत्रकार मंचाचे आणि माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे यांचे मनापासून आभार मानले. पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने यावेळी उपस्थित सर्व मुलींना हायजिन किट देण्यात आले. "प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर" हा संदेश यावेळी लहानग्या विद्यार्थिनींना देण्यात आला. स्वच्छता राखल्याने आजारी पडण्याचे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी होते. दैनंदिन जीवनात स्वच्छता राखण्याकरता आवश्यक असणाऱ्या गोष्टी यावेळी मुलींना प्रदान करण्यात आल्या.

या कार्यक्रमाला माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे, मंचाचे सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक मोरेश्वर पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, दीपक घोसाळकर,प्रवीण मोहोकर,राजू गाडे, जॉन्सन जॉर्ज,मुख्याध्यापिका नाझीया सायरा युसुफ दळवी,समन्वयक काझी सर, पीर करम अली शहा उर्दू माध्यम प्राथमिक शाळेतील शिक्षक वृंद यांची प्रमुख उपस्थिती होती.

# श्रीवर्धन मधील हा गंभीर प्रश्न सुटणार तरी कधी ?

दैनिक युवक आधार
श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित

श्रीवर्धन मध्ये वाहतूक कोंडी हा सगळ्यात मोठी समस्या निर्माण झाली आहे, रस्ता रुंदीकरण ही संकल्पना फक्त अजून कागदावरच असल्याचे दिसून येत आहे, काही वर्षापूर्वी रस्ता रुंदीकरण प्रक्रियेला सुरुवात झाली होती आणि जागेचे मोजमाप सुद्धा झाले होते पण नक्की कोणाच्या दबावामुळे किंवा आणखी कोणत्या कारणामुळे हे काम पुन्हा रखडले हे नलघडणारे कोड आहे, त्यात अनेक व्यापाऱ्यांच्या मुबई पुणे सारख्या ठिकाणाहून समान घेऊन येणाऱ्या मोठमोठ्या गाड्या समान उतरण्यासाठी त्यांना ठराविक वेळ ठरवून दिलेली असताना सुद्धा सर्रास पणे आपल्या मर्जीनुसार कधीही आणि मुख्य रस्त्यांमध्ये कुठेही उभ्या असलेल्या पहायला मिळतात त्यामुळे मात्र बाकी वाहन चालकांना याचा मनस्ताप सहन करावा लागतो, सामान्य नागरिकांची गाडी जर मुख्य रस्त्याला उभी असेल तर त्याला नाहक दंड ठोठावला जातो पण अशा मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या येणाऱ्या मोठ्या मालवाहतूक गाड्यांना इतकी सूट का दिली जाते ? नियम फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहेत का ? हाच प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.



# बाऱ्हाळी येथील आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त श्रावण मासानिमित्त महाप्रसादाचे कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या उत्साहात कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** - मुखेड वसंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हा महाप्रसाद, स्वप्निल शेषरावजी चव्हाण साहेब यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे प्रवीण पाटील चिखलीकर ,व वैशालीताई चव्हाण,यांचा अभिष्टचिंतन सोहळा व पवित्र श्रावण मासानिमित्त हेमाडपंथी महादेव मंदिर बाऱ्हाळी येथील महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे यावेळी कार्यक्रमाचे आयोजक म्हणून सुशांत भाऊ चव्हाण,तेजस भाऊ चव्हाण, यांची महाप्रसादाच्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती,तसेच बाऱ्हाळीतील वसंत शिक्षण प्रसारक मंडळ सरस्वती माधयामिक शाळेचे सर्व कर्मचारी वर्ग ,गुलाब सर,नरसिंग अस्वले सर,संजू सर सोनकांबळे, नाईक सर, संदीप पाटील,तसेच सर्व कार्यकर्ते व शाळेतील कर्मचारी, व्यापारी ,व मंदिर पुजारी गावकरी बाऱ्हाळी परिसरातील सर्व शाळांच्या विद्यार्थी, व विद्यार्थीनी गावातील अनेक भाविकभक्त वारकरी संप्रदाय भजनी मंडळ महिला पुरुष हजारोच्या संख्येने या महाप्रसादाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून अनेकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आहे






# एक मेव समाज सेवक महाराष्ट्रातील सुरज शेट गोरं गरिबांचे अन्न दाते यांचे वाढदिवस साधेपणाने साजरा

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

सुरज शेट चंदनी विशाल चंदानी जयश शेट मोंनटि शेट बंटि शेट सागर शेट सर्व मित्राने आपल्या साध्या सोप्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला आहे सुरज शेट समाज सेवक हे महिन्यातुन हजार ते दिड हजार गोरं गरिबांना राशेन व मुलांना शालीय साहित्य वाटप करतात आणि गोरं गरिबांच्या मुलांना कपडे खाऊ वाटप करतात सुरज शेट हे उल्हासनगर शहरातील गरिबांना दवाखाना हि मोफत विलाज करुन देतात सुरज शेट म्हणतात की जिथे कमी तीथे आम्ही असे ते म्हणतात मग दवाखाना असो शासकीय कामं असो कण्याशेट चंदानी समाज कार्य करणारे त्यांचे पुत्र हे सुरज शेट आहे जयसा बाप तयसा बेटा हे सुरज शेट त्यांचे बोल आहे आजही सुरज शेट हे समाजात साध्या पद्धतीने वागतात ना घमंड ना मी पणा सुरज शेट हे आपल्या स्वतःच्या खर्चाने आपली समाज सेवा करतात कोणाला हि एक रुपया न माघता आसीच माझ्या परिवारा कडुन व माझ्या कडून गोरं गरिबांची सेवा घडो हीच ईश्वरचरणी मी प्रथना करतो



# संस्था स्थापना दिनानिमित्ताने विद्यालयात विविध कार्यक्रम*

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल निफाड येथे संस्था स्थापना दिन( ६२ वा वर्धापन दिन )लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली .या वैविध्यपूर्ण कार्यक्रमाचे औचित्य साधून रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे ,संस्थेचे विश्वस्त ॲड आप्पासाहेब उगांवकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे ,राजेंद्र राठी, ॲड दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे व शाळेच्या मुख्याध्यापिका पल्लवी सानप यांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन, लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. इयत्ता पाचवी ते दहावीच्या उत्सुक विद्यार्थ्यांनी महापुरुषांबद्दल व त्यांच्या कर्तुत्वाची यशोगाथा आपल्या मनोगतातून व्यक्त केले. तसेच विद्यालयाच्या प्राचार्या पल्लवी सानप यांनी संस्थेचा इतिवृत्तांत व संस्थेच्या उज्वल यशाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. संस्था स्थापना दिनानिमित्ताने मराठी निबंध लेखन व हस्ताक्षर लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .त्यात इ. 3 री ते 10 वी पर्यंत 175 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# कार्यसम्राट आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी खारघरमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ०५ ऑगस्ट रोजी खारघर येथील शिवतेज मित्र मंडळ व साबाई माता महिला मंडळ यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. खारघर सेक्टर १२ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील श्री. दुर्गामाता मंदिर येथे होणाऱ्या या शिबिरात मधुमेह, रक्तदाब, नाडी परीक्षण, योगा मार्गदर्शन, महिलांच्या आरोग्य समस्या तसेच वैद्यकीय तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला या शिबिरात दिला जाणार आहे. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सेक्टर १२ महिला मोर्चाच्या अध्यक्षा सीमा खडकर यांनी केले आहे.

# जागृती फाऊंडेशन च्या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ,माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे यांची प्रमुख उपस्तीथी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जागृती फाऊंडेशन च्या वतीने साई नगर येथील गणपती मंदिरात मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी आयोजन केले होते. या शिबिराला लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर ,माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे ,महापौर कविता चौतमल ,पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रीत,मी म्हात्रे यांनी उपस्थिती दर्शवली .

जागृती फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने समाजउपयोगी उपक्रम राबिविले जातात ,आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून साई नगर येथील श्री साई गणेश मंदिर येथे नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या शिबिरामध्ये हिमोग्लोबिन ,मधुमेह ,डोळे तपासणी ,दातांची तपासणी, त्वचा रोग तपासणी आदी वर मोफत तपासणी करण्यात आली या शिबिराला माजी नगरसेवक श्रीकांत ठाकूर ,माजी महापौर कविता चौतमल यांच्या के सी डिग्नोसिस सेंटर ,तसेच एम जी एम रुग्णालय यांचे सहकार्य लाभले ,यावेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, सुनील बहिरा ,हेमलता म्हात्रे ,सारिका भगत, डॉ सुरेखा मोहकर आदी मान्यवरांनी शिबिराला भेट दिली



हे शिबीर यशस्वी करण्यासाठी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांच्या सह तळोजा विभागीय अध्यक्ष कल्पेश कांबळे , उपाध्यक्ष संदेश पाटील ,सरचिटणीस कुवर पाटील ,विकेश पाटील, वाकडी विभागीय अध्यक्ष दिपक भोपी, गिरवले विभाग अध्यक्षा अर्चना राजगुडे , प्रभाग क्रमांक १४ च्या अध्यक्षा शाईन खान ,सरचिटणीस फोउजिया मस्तते, पक्षात रांजणेकर आदींनी मेहनत घेतली

# तळा महसूल विभागाकडून वृक्ष लागवड कार्यक्रम.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**



**तळा** : महसूल विभागाच्या वतीने राज्यामध्ये एक ऑगस्ट रोजी महसूल सप्ताह दिन साजरा करण्यात आला. राज्यामध्ये एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट पर्यंत महसूल सप्ताह राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशान्वये माणगाव प्रांताधिकारी डॉ. संदिपान सानप, तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 3 ऑगस्ट रोजी तालुक्यातील मौजे. मझगाव, ताम्हाने कुडे, मांदाड या ठिकाणी गावांतील मोकळ्या जागा, तसेच रस्त्यांच्या दुतर्फा तळा महसूल अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ यांच्याकडून बांबू वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळेस तळा महसूल नायब तहसीलदार श्री. धर्मराज पाटील, मांदाड मंडळाधिकारी श्रीमती. समीरा राजेंद्र खाडे, ग्राम महसूल अधिकारी श्री. रामचंद्र भौड, श्री. रमेश नागरे, श्री. शुभम शेगोकर, श्रीमती. निधी रोडे, श्रीमती. नियती कदम तसेच गावागावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेवदंड्यात 'शून्य'वरून राष्ट्रवादी (अजित पवार) च्या 'सशक्त' प्रवासाला प्रवीण ठाकूर यांचा पक्षप्रवेश ठरेल टर्निंग पॉईंट ; अजित पवारांचा विरोधकांना कडक इशारा!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) रेवदंडा भागात 'शून्यावरून शिखराकडे' झेप घेण्याचा मुहूर्त आज अड. प्रवीण ठाकूर यांच्या पक्षप्रवेशाने लागत असल्याची जोरदार चर्चा जनतेत रंगली आहे. काँग्रेसचे माजी आमदार मधुकर ठाकूर यांचे पुत्र, अलिबाग नगर परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते प्रवीण ठाकूर यांनी सपत्नीक आणि शेकडो समर्थकांसह आज पक्षप्रवेश करत राजकीय समीकरणेच बदलून टाकली.



या कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन करताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांना इशाराच दिला "कोणत्याही पक्षाची सत्ता दीर्घकाळ टिकत नाही. जनतेनं आपल्याला संधी दिली आहे, आता तिचं चीज करायचं. कोकणासाठी आता फक्त बोलायचं नाही, तर करून दाखवायचं!"पुढे बोलताना त्यांनी रायगडच्या पालकमंत्री पदाच्या तिढ्याबाबत आश्वस्त करत सांगितले की, "तिन्ही पक्ष प्रमुख मिळून लवकरच पालकमंत्री ठरवू. पण तोवर जिल्हा नियोजन निधी कोणीही थांबवू शकत नाही."तटस्फूर्त भाषणात अजित पवारांनी थेट कामगिरीवर भाष्य केलं. "अलिबाग-वडखळ रस्त्याच्या डागडुजीवर गणपतीत वर्षानुवर्षे भर देतो, पण ही केवळ दिखावा पद्धत थांबवून पायाभूत कामं मार्गी लावण्याची वेळ आली आहे."एआय (AI) तंत्रज्ञानाचा वापर, कोस्टल रोड, जलवाहतूक, पर्यटन सुविधा, वैद्यकीय सेवा, शिक्षण व्यवस्था – या सर्वांवर सरकार लक्ष केंद्रीत करत असून, निधी कमी पडणार नाही असे त्यांनी स्पष्ट केलं.राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, "विरोधकांचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या ठिकाणी आता राजकीय परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. प्रवीण ठाकूर यांच्या प्रवेशाने पक्षाला नवे बळ मिळेल."पक्षप्रवेशानंतर अड. प्रवीण ठाकूर यांनी काँग्रेसमधील दुर्लक्षितपणाची नाराजी बोलून दाखवली आणि सांगितले, "खासदार सुनिल तटकरे साहेबांचे काम पाहून प्रेरणा मिळाली. कोकण विकासाचा कोणी वाली नाही ही खंत आहे. रेवस-करंजा पूल, वडखळ रोड हे अजूनही प्रलंबितच आहेत. हाच बदल घडवण्यासाठी आम्ही आलो आहोत."या सोहळ्यात महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, तसेच शेकडो कार्यकर्ते आणि स्थानिक नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ही बातमी रायगडात नवसंजीवनी ठरणारी आहे. रेवदंडा मध्ये जिथे राष्ट्रवादी अजून पर्यंत अस्तित्वात नव्हती, तिथे आता एक दमदार सुरुवात झाली आहे.

# पाणंद / शेत रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

३ ऑगस्ट रोजी तहसिलदार पनवेल कार्यालयातील मंडळ पळस्पे मध्ये मौजे - सोमटणे येथे पाणंद रस्तेच्या दुतर्फा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्याक्रमाकरीता उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तहसीलदार पनवेल विजय पाटील, मंडळ अधिकारी शशिकांत सानप, ग्राम महसूल अधिकारी व समस्त ग्रामस्थ ग्रामपंचायत सोमटणे उपस्थित होते.



सदर ठिकाणी वृक्षारोपण करुन स्वामित्व योजने अंतर्गत सनद वाटप करून भूधारणा वर्ग १ असलेल्या शेतकरी यांना सात बारा उतारे वाटप करण्यात आले. तसेच मंडळ तळोजा येथील मौजे तोंढरे येथेही पाणंद रस्तेच्या दुतर्फा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संबंधित मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व समस्थ ग्रामस्थ यांचेमार्फत पाणंद रस्तेच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांना अरुंद रस्त्यामुळे शेतमाल व यंत्र नेण्यास होणारी गैरसोय टाळण्यासाठी व सीमा वरून शेतकऱ्यांमध्ये होणारे वाद टाळण्यासाठी रुंदीकरण करून दुतर्फा झाडे लावणे हे आजच्या कार्यक्रमाचे केंद्रस्थान होते. सदर योजनेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न द्विगुणित करणे, पर्यावरण संवर्धन व जतन करणे व शाश्वत जमीन वापर यांसारखी उद्दिष्टे साध्य होतात.

तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडील १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह आयोजन करण्यात आले असून यामध्ये प्रत्येक दिवशी महसूल विभागाचे उपक्रम महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असून यामध्ये नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पहावयास मिळत आहे.

# जे.एन.पी.ए.विद्यालयातील कर्मचाऱ्यांचा आक्रोश : आर्थिक छळ आणि मानसिक त्रासाला कंटाळून११ऑगस्टपासून आमरण उपोषण.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**
जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील (शेवा) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आता सहनशीलतेच्या पलीकडे पोहोचले आहेत. गेल्या ७ वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक छळ आणि मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी येत्या ११ऑगस्ट,२०२५ पासून आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या रुस्तमजी केरावाला फाउंडेशन( विग्बोर ) संस्थेने त्यांच्यावर चालवलेला अन्याय आता चव्हाट्यावर आला आहे.



**७ वर्षांची थकीत रक्कम, मानसिकतेचा ऱ्हास**
कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, रुस्तमजी केरावाला फाउंडेशनने सातवा वेतन आयोग तर लागू केला नाहीच, पण त्यासोबतच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारी वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्ता जुलै २०१९ पासून दिलेला नाही. गेल्या सात वर्षांपासून ही थकीत रक्कम मिळालेली नाही. यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याची आर्थिक कुचंबणा झाली आहे आणि त्यांची मानसिकता ढासळली आहे. वारंवार शालेय समितीमध्ये विषय काढूनही संस्थेच्या प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली आहे.

**केवळ कागदावरच हस्तांतरण, प्रश्न प्रलंबितच.:-**
शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन जवळजवळ तीन वर्षांचा काळ लोटला आहे, तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या कागदावरच राहिलेल्या आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार पत्रव्यवहार करूनही आमच्या पत्रव्यवहाराची योग्य प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही, असे कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. यामुळे गेली सहा वर्षे केलेल्या पाठपुराव्यानंतरही सर्व प्रश्न प्रलंबितच राहिले आहेत. या अन्यायामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

**अंतिम निर्णय, प्रशासनाला इशारा. :-**
आता कर्मचाऱ्यांनी अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. जोपर्यंत सात वर्षांची थकीत रक्कम फरकासह त्यांच्या बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत ते जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा, येथील माध्यमिक इमारतीच्या गेटसमोर शांततेच्या मार्गाने आमरण उपोषण करतील. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, जर ११ ऑगस्ट, २०२५ पूर्वी थकीत रक्कम मिळाली नाही आणि या उपोषणादरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल.

**मागण्यांची पूर्तता होईपर्यंत लढा सुरूच. :-**
या निवेदनाची एक प्रत आमदार महेशजी बालदी, आमदार प्रशांतजी ठाकूर आणि माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांच्यासह अनेक राजकीय नेते, पालक संघटना, शिक्षक संघटना, समाजसेवक, कामगार नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे, जेणेकरून या गंभीर समस्येवर तातडीने लक्ष दिले जावे. कर्मचाऱ्यांनी आता आपली सर्व आशा सोडून न्यायासाठी थेट आंदोलनाचा मार्ग अवलंबला असून, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे दिसते.

## चालू वर्षी पारंपारिक पद्धतीने नागपंचमी सणाचा आनंद घेतला शिराळकरांनी"



**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):-**
न्यायालयाच्या आदेशानुसार व पारंपारिक वाद्यांच्या गजरात 32 शिराळा येथील नागरिकांनी उत्साहात नागपंचमीच्या सणाचा आनंद व्यक्त केला. शैक्षणिक उद्देशासाठी येथील 21 जणांना जिवंत नाग पकडण्याची परवानगी शासनाने दिल्यामुळे तब्बल 23 वर्षांनी बहिणींनी नागराजाचे दर्शन घेऊन उपवास सोडला आणि शिराळकर आनंदीत झाल्याचे दिसून आले. यंदा नागपंचमीसाठी येणाऱ्या भाविकांनाही अंबामातेच्या मंदिरामध्ये नागराजाचे दर्शन घडले. 21 जणांना प्रबोधनासाठी वेगवेगळी ठिकाणे दिल्यामुळे त्याचप्रमाणे महिलांनी प्रबोधन करण्यासाठी प्रथमच मंडळाची स्थापना करून पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढली .शेकडो वर्षापासून शिराळा येथील महिला भगिनी नागपंचमीच्या आदल्या दिवशी उपवास करतात व दुसऱ्या दिवशी नागाची पूजा केल्यानंतरच उपवास सोडतात. परंतु ही परंपरा 23 वर्षापासून न्यायालयीन बाबीमुळे थांबली होती. भगिनी नागाच्या प्रतिमेचे पूजन करून उपवास सोडत. परंतु पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय वन्यजीव विभाग नवी दिल्ली यांच्याकडून 21 जणांना शैक्षणिक उद्देशासाठी व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम अन्वये अभ्यास ,शिक्षण करण्यासाठी नाग पकडण्यास मंजुरीबाबत 27 ते 31 जुलै या कालावधीत अटी शर्तीस अधीन राहून परवानगी दिली. व्यावसायिक किंवा मनोरंजन स्पर्धा, मिरवणूक ,खेळ याला अटकाव केला होता. दरम्यान मंगळवारी सकाळपासून ग्रामस्थासह तरुणाई मध्ये उत्साहाचे वातावरण होते. सर्व नागमंडळांनी अंबामातेचे व मरीआई देवीचे दर्शन घेऊन मरिआईच्या व अंबाबाईच्या नावाने चांगभले असा गजर करत मिरवणुकीला सुरुवात केली. शहरात पोलीस व वनविभागाने मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात केला होता. यंदा जिवंत नागांमुळे शिराळ्यात चैतन्य दिसून आले.

## टाकळी (आ.) या ठिकाणी पाईपलाईनच्या गजकेत दुचाकी स्वाराचा अपघात

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**
दि. 2 ऑगस्ट टाकळी आमिया (ता. आष्टी) येथे रस्त्यातून जाणाऱ्या पाईपलाईनच्या गचकेत मोटरसायकल घसरल्याने अपघात झाला. रुई ते कडा या 10 किलो मीटर अंतरामध्ये तब्बल २० ते २२ पाईपलाईन रस्त्यावरून गेल्या आहेत,त्यामुळे अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.
अपघातात दुचाकीस्वार रामदास ससाणे (अंदाजे 58 वय असून) गंभीर जखमी झाले असून त्यांना अहिल्यानगर या ठिकाणी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे रस्त्यावरील पाईपलाईनमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असल्याची स्थानिकांची तक्रार आहे.





दैनिक युवक आधार प्रतिनिधी :- योगेश पालोदकर
छत्रपती संभाजी नगर जिल्हा कॉँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी किरण पाटील डोणगावकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे सरचिटणीस कृष्णा पाटील बावस्कर, जिल्हा उपाध्यक्ष शांतीलालजी अग्रवाल, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हा सरचिटणीस देशमुख.

## सुरगाणा महाविद्यालयात वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.
यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे,डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ.रवींद्र हिरे, प्रा.सुरेश भोये, प्रा. कविता भोये, प्रा.गुलाब पवार, गिरीधर भालेराव, नाना कोर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## खोपोली येथे आरडीसीए आयोजित पंच शिबिरामध्ये तज्ञांचे बहुमूल्य मार्गदर्शन.




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**
– रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने शनिवार दि.०२ ऑगस्ट रोजी खोपोली येथील आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे यांच्या महाराजा बँक्वेट हॉल मध्ये रायगड जिल्ह्यातील क्रिकेट पंचांच्या दुसऱ्या सत्राच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यातील पंचांना मार्गदर्शन करण्यासाठी माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले,मुंबई क्रिकेट असो.चे पंच राजन कसबे,क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा उपस्थित होते.शिबिरामध्ये जिल्ह्यातील ५० पंचांनी सहभाग घेतला असून शिबिर एकूण १०० दिवस ऑनलाइन व प्रत्यक्ष कार्यशाळा वर्ग घेऊन सुरू आहे,रायगड पंच पॅनलची परीक्षा २३ ऑगस्ट रोजी होणार आहे.खोपोली येथील पंच शिबिरामध्ये एमसीसी क्रिकेट लॉ,महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या एकदिवसीय, टी-२० व मल्टी डेज क्रिकेट सामन्यांच्या नियमांसह अन्य नवीन नियमांचे प्रात्यक्षिकं काशी क्रिकेट अकॅडमीच्या टर्फ वर करून दाखवण्यात आली व सर्व नियम समजावून सांगण्यात आले.आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे,सदस्य कौस्तुभ जोशी यांनी गतवर्षी आरडीसीए तर्फे सर्व वयोगटातील मुलामुलींच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून सर्व मिळून जवळपास ३२५ सामन्यांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली,तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित सोळा वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेतील १५ दोनदिवसीय सामन्यांचे आयोजन रायगड जिल्ह्यात करण्यात आले असल्याचेही सांगीतले.गतवर्षी झालेल्या सर्व सामन्यांसाठी रायगड जिल्ह्यातील प्रशिक्षित पंचांनी आपले योगदान दिले असल्याने सर्वांचे आभार वक्त करण्यात आले.यावर्षीच्या क्रिकेट हंगामासाठी आरडीसीए तर्फे विविध वयोगटातील व खुल्या गटातील मुला- मुलींचे मिळून किमान ५०० सामन्यांचा आराखडा तयार करण्यात असल्याची माहिती कौस्तुभ जोशी यांनी उपस्थित सर्व पंचांना दिली.शिबिराच्या कार्यक्रमासाठी आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे,सदस्य कौस्तुभ जोशी,अड.पंकज पंडित,शंकर दळवी,विनोद सोळंकी,प्रशिक्षक म्हणून हर्षद रावले,राजन कसबे,नयन कट्टा उपस्थित होते.पंच शिबिरासाठी यशवंत साबळे यांनी आपला महाराज बँक्वेट हॉल विनामूल्य दिल्याबद्दल आरडीसीए तर्फे त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.रायगड जिल्ह्यात जास्तीजास्त प्रशिक्षित पंच तयार व्हावेत ह्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशन कायम प्रयत्नशील असणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांनी प्रसार माध्यमांना सांगितले.



## भारज बुद्रुक येथील श्री शिवाजी विद्यालयाच्या प्राचार्य पदी एम.जे. लुटे सर यांची निवड !

**दैनिक युवक आधार**
**जाफ्राबाद प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे**
जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील मुख्याध्यापक श्री एस ए नवले सर यांच्या सेवानिवृत्त झाल्यानंतर शाळेतर्फे त्यांना निरोप समारंभ कार्यक्रम करण्यात आला
सदर निरोप समारंभाच्या कार्यक्रमासाठी अनेक प्रमुख नागरिकांची उपस्थिती होती यावेळी अनेकांनी श्री नवले सर यांच्या कार्याची कौतुक करून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या
दुसऱ्या दिवशीच शालेय प्रशासनाच्या वतीने येथील अनुभवी कार्य कुशल शिक्षक श्री एम जे लुटे सर यांची शाळेच्या प्राचार्य पदी अधिकृत नियुक्ती संस्थेचे वतीने करण्यात आली.
एमजे लुटे सर यांच्या बाबतीत थोडक्यात सांगायचे झाल्यास श्री लुटे सर पंधरा वर्षपिक्षा अधिक कार्यकाळापासून शाळेवर कार्यरत आहे शाळेत शिकवणी वर्गापासून ते प्रशासकीय अनुभव सूत्रसंचालन व मॅनेजमेंट या सर्वच पातळीवर मोठा तगडा अनुभव श्री लुटे सर यांना आहे जनमानसात व पालक वर्गात त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करून अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या साहजिकच श्री लुटे सर यांची निवडीमुळे मजबूत असलेल्या श्री शिवाजी शालेय संस्था अधिक नव्या जोमाने काम करून विद्यार्थ्यांचेशैक्षणिक संगोपन करून विद्यार्थ्यांना उच्च पातळीवर पोहोचवण्यासाठी नक्कीच सर्व शिक्षक मेहनत घेतील श्री लुटे सर यांची मुख्याध्यापक पदी निवड झाल्याबद्दल सरपंच श्री रामचंद्र तेलंग्रे माजी सरपंच तुळशीराम पायघन पोलीस पाटील संजय तेलंग्रे तंटामुक्ती अध्यक्ष विलास गायकवाड विलास क्षीरसागर सामाजिक कार्यकर्ते उमेश भैय्या रहेकवार राजेश दामधर पत्रकार राम सुरडकर शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीचे सदस्य गणेश काटकर कैलास राऊत गजानन नवले रामेश्वर तेलंग्रे शंकर डब्बे पत्रकार आदी गावकरी मंडळी आणि शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते

## उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीत भुरट्या चोरांचा वावर !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**
उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीत नवघर,नवघरपाडा आणि कुंडेगाव मिळून नवघर ग्रामपंचायत असून या तिन्ही गावांमध्ये आवो जावो ये गाव तुम्हारा है !! कोई भी आओ कोई भी जाओ !! अशी आवस्था झाली असून संपूर्ण रायगड जिल्हासह उरण तालुक्यातील भाडोत्र्यांचा गाव म्हणजे नवघर गाव अशी ओळख आज नवघर गावाची झाली आहे.रात्री अपरात्री भाडोत्री गावात फिरत असतात पण या भाडोत्र्यांवर कोणाचेही बंधन नाही नवघर ग्रामपंचायत तर भाडोत्री या समेस्येवर मुग गिळून गप्प असलेली पाहावयास मिळत आहे.येथील स्त्री वर्गालाही या भाडोत्र्यांचा आश्लील हावभावांचा सामना करावा लागत आहे पण भाडोत्री मालकांच्या दहशतीने गप्प राहतात आणि जर एखादा गावकरी या मोकाट रात्री अपरात्री भाडोत्री फिरताना दिसला आणि त्याला हटकले तर त्या भाडेकरूंचे रूम मालक भांडणावर उतरतात म्हणून भांडणतंटा नको म्हणून ग्रामस्थ देखील गप्प बसून हिन्या ओट्यावर फक्त नवघर गावच्या विकासाच्या आणि सुरेक्षितेच्या गोष्टी करताना धन्यता मानतात. फक्त निवडणुका आल्या कि गावाच गावपण आठवणारे पु-ढा-री गावात भरपूर पाहावयास मिळतात तसेच निवडून आले कि गावक-यांना वा-यावर सोडून शहरात राहायला जाऊन तेथून गावच्या विकासाच्या शेळ्या हाकलतात पण गावातील होणा-या छोट्या मोठ्या गोष्टींकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून स्वता:ची पाठ थोपटून धन्यता मानत आहेत.गावची लोकसंख्या जवळपास २ ते ३ हजार तर नवघर गावातील भाडेकरूंची लोकसंख्या गावक-यांच्या ४/५ पटीने जास्त असून ग्रापंचायतीकडे या भाडेकरूंची काहीच माहिती नाही याचे नवल येथील ग्रामस्थ करतात. नवघर गावात घराजवळील पार्कींग करून ठेवलेल्या मोटरसायकल,सायकली हे चोरटे रात्रीचा फायदा घेऊन चोरण्याचा प्रकार आज शनिवार दिनांक ०३/०८/२०२५ रोजी नवघर गावातील मध्येभागी असणा-या घराजवळून दैनिक युवक आधारचे रायगड जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर यांच्या घराजवळून उभी असणरी मोटार सायकल (स्कुटी) MH 46 BT 1754 ही गाडी चोरून घेऊन गेले असून या बाबत उरण पोलिस स्टेशन येथे मोटारसायकल चोरीची तक्रार दाखल केली असून दैनिक युवक आधारच्या रायगड जिल्हा प्रतिनिधी म्हणून नवघर ग्रामपंचायत हद्दीतील नवघर,नवघरपाडा तसेच कुंडेगावातील नागरिकांना सतर्क राहून आपल्या सायकळी,मोटारसायकली तसेच घराबाहेरील वस्तूंवर नजर ठेवा रात्र वैराची आहे ! आताचे दिवस चोरांचे आहेत !! तसेच सदर नवघर ग्रामपंचायतीच्या आष्टपैलु सदस्यांना गावातील वाढत्या भाडोत्र्यांच्या संख्येची माहीती बद्दल नवघर ग्रामपंचायतीकडे विचारणा केली तर ग्रामस्थांच्या खचकन आंगावर येऊन एकट्या दुकट्या नागरिकांवर एकप्रकारे दहशतच निर्माण करत असून येथील ग्रामस्थ यांच्या भितीने कोणीही काहीही बोलण्या तयार नाहीत फक्त ग्रामपंचायतीच्या निवडणुका आल्या कि दारोदारी मतांच्या भिका मांगायला घरादाराशी मतदारांच्या दारशी मात्र नचुकता येताना धन्यता मानणारे नवघर गावचे ज्यांना देणेघेणे नसणा-या पुढारांना मनापासून ग्रामस्थ धन्यवाद देतात कि श्राप देतात देव जाणे !!






## वाचनाने सजग नागरिक निर्माण होतो - लक्ष्मीकांत देशमुख

### डॉ. विठ्ठल जाधव यांच्या बालसाहित्य समीक्षा ग्रंथास राज्य पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**बीड:**
बालसाहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य' या समीक्षा ग्रंथास लीलावती भागवत राज्यस्तरीय पुरस्कार पुणे येथे दि. २ ऑगस्ट रोजी ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. वाचन ही उन्नत मानवी संस्कृती आहे. चारित्र्यवान पिढीसाठी बालवाचक घडविणे गरजेचे आहे. वाचनातून मुलांची जिज्ञासा आणि आकलन वाढते तर लोकशाही टिकविण्याचे कार्य सजग नागरिक करत असतात आणि वाचन हे सजग नागरिक निर्माण करते असे प्रतिपादन ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी यावेळी बोलताना केले. मराठी बाल साहित्यातील उत्कृष्ट निर्मितीसाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. रोख रक्कम, प्रमाणपत्र, ग्रंथ भेट देऊन राज्यातील लेखक, प्रकाशक, चित्रकार यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी लता मंगेशकर सभागृह, मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू कार्यवाह अनिल कुलकर्णी प्रसाद भडसावळे प्राचार्य राजेंद्र झुंजारराव, संजय ऐलवाड सचिन बेंडभर, राजेंद्र जेधे, तात्यासाहेब भराटे, संजीवनी जाधव, राहुल काशिद, ऋषिकेश जाधव, ओंकार जेधे यांचेसह राज्यभरातील लेखक कवी, प्रकाशक यांची उपस्थिती होती.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# विलास जाधव यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघ मुरबाड तालुका अध्यक्षपदी एकमताने निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.गौरव खरे.मुरबाड.**

मुरबाड तालुक्यातील तडफदार, जिद्दी आणि कार्यक्षम सामाजिक कार्यकर्ता विलास कमलाकर जाधव यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघ मुरबाड तालुका अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. ही निवड शिवनेरी शासकीय विश्रामगृह, मुरबाड येथे आयोजित विशेष बैठकीत पार पडली. या नियुक्तीसाठी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप आणि प्रदेशाध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे यांचे मार्गदर्शन लाभले. समाजहिताच्या दृष्टिकोनातून नव्या जोशात काम करणाऱ्या युवकाला संधी देण्यात आली आहे. याच कार्यक्रमात पुढील पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली. शाम नारायण जाधव – ठाणे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य राजू हरी रोकडे – मुरबाड तालुका सचिव



या निवडीनंतर विलास जाधव यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले
"संघटनेचे काम जोमाने राबवून चर्मकार समाजाच्या तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी पूर्ण समर्पित राहीन. सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार व हक्कांसाठी आवाज बुलंद ठेवून संघटना मजबूत करण्याचा निर्धार केला आहे."
यावेळी या कार्यक्रमास राम बनसोडे – ठाणे जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय चर्मकार महासंघ
दिनेश उघडे – आरपीआय (आठवले) मुरबाड तालुका अध्यक्ष
भैरवनाथ वाघमारे – कल्याण-डोंबिवली जिल्हाध्यक्ष
गजेंद्र राऊत – जिल्हा सरचिटणीस
सोमनाथ राऊत – ज्येष्ठ मार्गदर्शक
भिकाजी कांबळे – ज्येष्ठ समाजसेवक
रमेश देसले – आरपीआय मुरबाड तालुका उपाध्यक्ष
धनंजय थोरात – आरपीआय युवक अध्यक्ष, मुरबाड
प्रा. नरेश मोरे – संस्थापक अध्यक्ष, लोकक्रांती संघटना
महेश जाधव, सचिन शिंदे, चंद्रकांत चव्हाण, श्री. सुराडकर, शिवाजी भिसे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने समाजबांधव यावेळी उपस्थित होते.
या निवडीमुळे चर्मकार समाजामध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, नव्या नेतृत्वाकडून ठोस कार्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कुरेशी समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी
## तहसीलदार मार्फत राज्यपालांना निवेदन

**दैनिक युवक आधार - घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

घाटंजी भारतामधील प्राचीन व मेहनती समाज म्हणून ओळखला जाणारा कुरेशी समाज सध्या गंभीर आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय अडचणींशी झुंज देत आहे. आपला कायदेशीर व्यवसाय व जगण्यासाठीचा संघर्ष आता प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी घाटंजी येथील कुरेशी समाज बांधवांनी दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी शांततामय पद्धतीने स्थानिक तहसीलदार मार्फत महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री सह वरिष्ठांना निवेदन सादर केले. समाजाने केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण देशभरात कुरेशी समाजाची लोकसंख्या सुमारे २ कोटी ९० लाख आहे. या समाजातील अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. काही जण शिक्षण घेऊन नोकरी करून उदरनिर्वाह करत



असले तरी बहुसंख्य कुटुंबे शेतीपूरक व्यवसाय, दूध उत्पादन आणि दुधाळ जनावरांची खरेदी-विक्री करून कुटुंबाचे पोषण करतात. समाजाचे म्हणणे आहे की, 'हा व्यवसाय आमच्यासाठी केवळ उपजीविकेचा मार्ग नाही, तर आमच्या अस्तित्वाशी निगडित आहे. आमच्या वृद्ध पालकांचा सांभाळ, लहान मुलांचे शिक्षण आणि महिलांची जबाबदारी या व्यवसायावरच अवलंबून आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाने शेती आणि दूध उत्पादनासाठी जनावरांच्या खरेदी विक्रीस कायदेशीर मान्यता दिलेली असून कुरेशी समाजातील व्यापारी पूर्णपणे कायद्याचे पालन करतात. त्यांच्या कडे आवश्यक ते परवाने, वैध कागदपत्रे, पशुवैद्यकीय प्रमाणपत्रे आणि बाजारातील पावत्या उपलब्ध असतात. अनेक परवाने हे त्यांच्या वडिलांच्या काळापासून चालत आलेले असून सध्या या परवान्यांचे नूतनीकरण थांबले आहे. यासंदर्भात परवान्यांचे तातडीने नूतनीकरण करून देण्यात यावे अशी मागणी समाजाने केली आहे. परंतु याउलट काही संघटनांकडून पोलिस यंत्रणेला चुकीची माहिती पुरवून दबाव टाकला जात असल्याने समाजातील गरीब व्यापाऱ्यांवर अन्यायकारक कारवाई होत असल्याचे आरोप निवेदनात करण्यात आले आहेत.
'कायदेशीर कागदपत्रे असतानाही आमच्या गाड्या अडवल्या जातात, जनावरे कथित गोशाळांमध्ये पाठवली जातात आणि ती परत मिळवण्यासाठी प्रचंड रकम आकारली जाते. या प्रकारांमुळे आमच्या समाजावर मानसिक, सामाजिक आणि आर्थिक ताण निर्माण झाला आहे.' असे प्रतिनिधींनी स्पष्ट केले. यामुळे कर्जबाजारीपणात वाढ, मुलांचे शिक्षण थांबणे आणि वृद्ध पालकांच्या उपचारात अडचणी अशा समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत.
दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी कुरेशी समाज बांधव घाटी येथील मस्जिद येथून निघून हा उपक्रम सुरू केला असून, प्रतिनिधी मंडळाने घाटंजी पो.स्टे., तहसिल कार्यालय,या ठिकाणी निवेदन सादर केले आहे. यावेळी ऑल इंडिया जमैतुल कुरेशचे तालुकाध्यक्ष कज्जुम कुरेशी, शहराध्यक्ष सलीम कुरेशी, उपाध्यक्ष नईम कुरेशी,शेख जमीर कुरेशी, इर्शाद कुरेशी, शेख करीम कुरेशी, शेख इमाम कुरेशी,अ. कलीम कुरेशी, तन्वीर कुरेशी, इक्बाल कुरेशी,मोना कुरेशी, एजाज कुरेशी, रिजवान कुरेशी, रियाज कुरेशी,कय्युम कुरेशी,अलीम कुरेशी,सोनु कुरेशी, चिंटु कुरेशी,एफाज कुरेशी, वासिम कुरेशी, सह इतर कुरेशी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरपुड गावातील शेतकऱ्याच्या गोठ्याला आग, सहा जनावरे भाजून गंभीर जखमी

**दैनिक युवक आधार**
**खेड पुणे प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओव्हाळ**

शेतकरी देवराम मदगे यांच्या गोठ्याला रात्री १२ वाजता अचानक आग लागली
स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात परंतु शेतकऱ्याचे मोठे नुकसान
डॉ. देवेंद्र ओव्हाळ, डॉ, राठोड. डॉ वेदांत यांनी भाजलेल्या जनावरांवर केले उपचार खरपुड येथील रहिवासी असलेलं शेतकरी श्री देवराम तुकाराम मदगे यांच्या जनावरांच्या गोठ्याला रात्री १२:०० च्या दरम्यान अचानक आग लागली त्या आगीत ४ म्हशी व २ बैल गंभीर रित्या भाजले आहेत. रात्रीच्या वेळी सर्व झोपेत असल्याने लवकर समजले नाही. जनावरांच्या ओरडण्याचा आवाज आल्याने देवराम मदगे यांनी गोठ्याकडे धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. यामध्ये शेतकरी देवराम मदगे यांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.
=सकाळी ६ वाजता कुडे बु!! पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखान्याचे डॉक्टर डॉ. नवनाथ राठोड, डॉ. वेदांत ओव्हळ, डॉ. देवेंद्र ओव्हाळ यांच्या सोबत संपर्क केला असता त्यांनी ताबडतोब घटनास्थळी पोहोचून सर्व भाजलेल्या जनावरांवर प्राथमिक उपचार केले परंतु त्यापैकी दोन म्हशी या जवळपास ८५% गांभीर भाजलेल्या असल्यामुळे या म्हशी दगावन्याची जास्त शक्यता आहे असे डॉक्टरांनी सांगितले. परंतु आमच्या कडून ही सर्व जनावरे वाचवण्यासाठी पूर्ण प्रयत्न करू असे डॉ. देवेंद्र ओव्हळ आणि डॉ. राठोड यांनी सांगितले. पोलीस पाटील सौ. संगीता सुरेश



भोकटे, सरपंच श्री. तानाजी चिंधू भोकटे, तलाठी सौ. संगीता जाधव मॅडम, तंटामुक्ती अध्यक्ष श्री. तुकाराम महादू ठुबल आणि उपस्थित ग्रामस्थ दत्तू कोकाटे, किसन मदगे, शंकर सांगडे, सुनिल भोकटे (ग्रामपंचायत शिपाई) दत्तू सांगडे, बाळू वामन मदगे (चेअरमन), नाना आंभिरे आदि ग्रामस्थांच्या उपस्थित घटनास्थळी पहानी करून पंचनामा करण्यातआला आहे. सर्व जनावरे मोठ्या प्रमाणात भाजली असून या सर्वांचा उपचारासाठी लागणारा खर्च हा सदर शेतकरी श्री देवराम तुकाराम मदगे यांना झेपणारा नाही त्यामूळे त्यांनी प्रशानाकडे आर्थिक मदतीची विनंती केली आहे.

# पिंपळस ते येवला चौपदरी रस्ता काँक्रीटीकरण कामास गती द्या "मंत्री छगन भुजबळ "

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



पिंपळस ते येवला चौपदरी रस्ता काँक्रीटीकरण कामास अधिक गती देण्यात येऊन काम नियोजित वेळेत पूर्ण करावे, अशा सूचना राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी संबंधित अधिकारी यांना दिल्या.
मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून पिंपळस ते येवला या ५६० कोटी निधीतून चौपदरी काँक्रीटीकरण रस्त्याचे काम सुरू आहे. या कामाची आज निफाड येथे भुजबळ यांनी पाहणी केली. त्यावेळी ते सबंधित अधिकाऱ्यांशी बोलत होते.
रस्त्याच्या कामाला अधिक गती देत या कामाचा दर्जा देखील उत्तम स्वरूपाचा राहील याची दक्षता घ्यावी. तसेच काम सुरू असताना इतर वाहतूक सुरळीत सुरू राहण्यासाठी पर्यायी रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावे तसेच वाहतुकीचे योग्य नियोजन करावे, अशा सूचनाही भुजबळ त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.
यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता मयूर मोहिते, शाखा अभियंता दिलीप चौधरी, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# मैत्री दिनाचे औचित्य साधून माणगांव तालुक्यातील कालवण गावातील तरुणांनी वृक्षारोपण साजरा केला.

**दैनिक युवक आधार**
**माणगांव रायगड प्रतिनिधी:- सचिन पवार**

माणगांव :-दिनांक ०३/०८/२०२५ वार रविवार रोजी सार्वजनिक मैत्री दिनाचे औचित्य साधून माणगाव तालुक्यातील कालवण गावातील काही तरुण वर्ग ग्रामस्थ तसेच क्रिकेटप्रेमी यांनी एकत्रित येऊन वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहीम यांची एकत्रित सांगड घालून मैत्री दिनानिमित्त निसर्गाशी मैत्री करण्याचा छोटा पण प्रामाणिक प्रयत्न करून तालुका माणगाव या भागातील समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे तो म्हणजे मैत्रीदिन असाही साजरा करता येऊ शकतो. यांनी आजच्या दिवसाची सुरुवात ही सकाळी ९:०० वाजता गावच्या मध्यभागी असलेल्या मैदानात झाली तिथून गावाकडे



येणाऱ्या रस्त्याची साफसफाई करत करत गावची मंदिर परिसर आणि आजूबाजूचे पण अती दाटीचे वाढलेले झाडे झुडपे देखील खुरप्याने स्वच्छ करण्यात आले तसेच जेथे गवत वाढून येत्या गणेशोत्सवात अडचण होईल अशा ठिकाणी तण नाशक फवारले. त्यानंतर गावातील तरुण वर्गाने आणलेली झाडे घेऊन एकत्रित वृक्षारोपण करण्याचा आनंद लुटला तसेच या वृक्षरोपणात सीड बॉल हा एक नवा आणि आधुनिक उपक्रम पार पाडला जे काही ग्रामस्थ वर्गाला आश्चर्य वाटेल असे वाटले. तसेच येत्या काळात सामाजिक कोणतेही कार्य असेल त्यात आम्ही खारूचा वाटा नक्कीच असेल असे प्रतिपादन अनेकांनी केले. तसेच ४ तासाची ही स्वच्छता आणि वृक्षारोपण मोहीम आम्हाला खूप काही शिकवून गेली आणि निसर्गाशी जवळीक साधून निसर्ग आणि निसर्गाशी मैत्री याबाबत अधिक जवळून अनुभवता आला आणि या उपक्रमाचा आनंद घेऊन सर्व जणांच्या चेहऱ्यावर समाधान कारक हास्य कार्यक्रम अंती दिसून आला.यात सहभागी काशीराम हर्णेकर,नथुराम जाधव,सुरेश सुतार,किरण सुकूम,अनंत वाढवल,रवींद्र लाडघरे,प्रशांत हर्णेकर,सुशांत दांडेकर,रवींद्र बंगाल,सुरज सुकूम,संकेत जाधव,शुभम हर्णेकर,राजा साळवी,अनिल साळवी,रोशन सुकूम,सुमित जुमारे,रोहन बंगाल,रितेश डवले,मंगेश दांडेकर या कार्यक्रमात उपस्थित होते.

# श्रीवर्धन तालुक्यात महसूल सप्ताहाची प्रभावी अंमलबजावणी

## महसूल सप्ताहाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा- प्रांताधिकारी महेश पाटील

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धनः संतोष रेळेकर**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार १ ते ७ ऑगस्टदरम्यान साजऱ्या होत असलेल्या महसूल सप्ताह अंतर्गत रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन तालुक्यात विविध लोकाभिमुख उपक्रमांचे प्रभावी आयोजन करण्यात येत असून नागरिकांचा मोठा सहभाग लाभत आहे. महसूल विभागाच्या कार्यक्षम अंमलबजावणीमुळे शासन योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. या संपूर्ण सप्ताहात महसूल विभागाच्या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून श्रीवर्धन महसूलच्यावतीने नागरिकांना



माहिती, सेवा आणि मदत वेळेवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. महसूल दिनानिमित्त दि. १ ऑगस्ट रोजी श्रीवर्धन उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महसूल विभागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दि. २ ऑगस्ट रोजी प्रांताधिकारी महेश पाटील यांनी मौजे वांजळे व दिवेआगर येथे भेट देत २०११ पूर्वीच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणासंदर्भात नागरिकांशी थेट संवाद साधला. अतिक्रमण नियमितीकरणासाठी नियमबद्ध प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दि. ३ ऑगस्ट रोजी सायगाव येथे पाणंद रस्त्यांची पाहणी करून त्या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासोबतच शेतकऱ्यांच्या

> महसूल सप्ताहाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी श्रीवर्धन-म्हसळा महसूलचे सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी कटीबद्ध आहेत. महसूल सप्ताह अंतर्गत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा. आपल्या शंकांचे निरसन करावे. नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपले शासकीय दस्तऐवज, हक्क, व सेवांविषयी माहिती घ्यावी, शंका विचाराव्यात व आवश्यक लाभ मिळवावा. हे अभियान यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.
> – **प्रांताधिकारी महेश पाटील**

अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला. दि. ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत शासकीय दाखले वाटप कार्यक्रम मंडळनिहाय पार पडले. श्रीवर्धन, बोर्ली पंचतन, वाळवट तसेच म्हसळा तालुक्यातही ऑनलाईन नोंदणीसह दाखले वाटप शिबिरे आयोजित करण्यात आली होती. दि. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील अपूर्ण डीबीटी लाभार्थ्यांना भेट देऊन थेट अनुदान वितरणाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानंतर, दि. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासन आणि शर्तभंग प्रकरणांचा निर्णय, तर दि. ७ ऑगस्ट रोजी M-SAND धोरण अंमलबजावणी व नव्या एसओपीच्या पार्श्वभूमीवर महसूल सप्ताहाची सांगता होणार आहे.

# एक पेड माँ के नाम या उपक्रम अंतर्गत जनजागृती वृक्षदिंडी.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड/प्रतिनिधी रणजितसिंह ठाकूर :**

-मेहकर तालुक्यातील गणपूर येथील गुरुकृपा माध्यमिक विद्यालय.व जि.प मराठी प्राथमिक शाळेने इको क्लब अंतर्गत *एक पेड माँ के नाम* या उपक्रमाच्या फलश्रृती साठी जनजागृती होण्याच्या हेतुने गावातून वृक्षदिंडी काढली. त्यामध्ये विद्यार्थ्यांजवळ विविध वृक्ष तसेच वृक्षारोपणा वर आधारित विविध नारे देण्यात आले होते. गावातील विविध ठिकाणी शाळेतील शिक्षक श्री डी एस राठोड यांनी वृक्षलागवडीचे महत्व सांगीतले. सोबतच ग्रामवासियांनी हाती घेतलेला *हागणदारी मुक्त गांव* याविषयीही संपुर्ण गावात जनजागृती केली. स्वच्छतेतुन समृद्धी/विकास कसा साधता येईल.याविषयी सविस्तर माहिती श्री राठोड यांनी दिली.सदर कार्यक्रमास दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व वियार्थी तथा सरपंच,उपसरपंच,ग्रा.पं सदस्य, ग्रामसेवक मॅडम,पो.पाटील,तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रा.पं सेवक,तथा विविध पदाधिकारी हजर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दोन्ही शाळेचे मु अ श्री पी.डी चेके,श्री आटोळे सर शिक्षक श्री सचिन पडघान, श्री अशोक आखरे, श्री प्रकाश लोखंडे,श्री कैलास तुपकर, श्री



बाजड सर,श्री मोरे सर,गणेश चव्हाण,शैलेश चव्हाण,गजानन नरवाडे,श्री बालुभाऊ गारोळे,श्री गोपाल चव्हाण,सुनील डोंगरदिवे,श्री राजुभाऊ आखरे अंगणवाडी सेविका,आशा सेविका,श्री चव्हाण,गारोळे,आखरे,नरवाडे तथा ग्रामस्थ यांनी अथक परिश्रम घेतले.

## हौस ..

लग्न मुंज समारोह
दुधडी वाहते हौस
दिमाख सारा दावा
दणकेबाज रे घौस

बचतीचे ढग खाली
पैशाचा पडे पाऊस
समारंभ हा एकदा
ना मागे पुढे पाहूस

कर्ज मिळते सहज
नकोभिवूनजाऊस
बडेजाव शर्यतीचा
माघार नको घेऊस

पक्वान्नांची रेलचेल
चालतराहे नासधूस
बोलव जथेच्याजथे
नीट करे विचारपूस

डेस्टिनेशन मॅरेजचा
भरवा बाहेर ऊरूस
लाड पुरवता मुलांचे
विचार नको करुस

नको हिताचा सल्ला
कानात घाल कापूस
अडविता कुणी उगा
समाचार घे खरपूस

**- हेमंत मुसरीफ पुणे.**

# आर्थिक मदत, कमी व्याजदरात कर्ज द्या

### ट्रम्प टॅरिफला तोंड देण्यासाठी निर्यातदारांची मंत्री पियूष गोयल यांच्याकडे मागणी

### अन्न, सागरी आणि कापड यासह विविध क्षेत्रातील उद्योजकांचे साकडे

### लेखी सूचना पाठविण्याचा मंत्र्यांचा मुंबईतील बैठकीत सल्ला

**नवी दिल्ली :** अन्न, सागरी आणि कापड यासह विविध क्षेत्रातील भारतीय निर्यातदारांनी २५ टक्के ट्रम्प टॅरिफला तोंड देण्यासाठी सरकारकडून आर्थिक मदत आणि परवडणाऱ्या व्याजदरात कर्ज देण्याची मागणी केली आहे, असे उद्योग अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबईत वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांच्याशी झालेल्या बैठकीत काही निर्यातदारांनी उत्पादनसंबंधित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेच्या धर्तीवर योजना सुरू करण्याची मागणी केली, असे त्यांनी सांगितले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या उच्च शुल्कामुळे अमेरिकन बाजारपेठेत त्यांना येणाऱ्या समस्या निर्यातदारांनी मांडल्या आहेत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. मंत्र्यांनी निर्यातदार समुदायाने त्यांच्या सूचना लेखी स्वरूपात पाठवाव्यात, असे सुचवले आहे.

त्यांनी परवडणाऱ्या दरांवर कर्ज आणि आर्थिक प्रोत्साहनांचीही मागणी केली.

निर्यातदारांच्या मते, भारतात



अधिकृत डीलर बँकांकडून कर्जदाराच्या जोखीम मूल्यांकनावर अवलंबून व्याजदर ८ ते १२ टक्के किंवा त्याहूनही जास्त असतात. प्रतिस्पर्धी देशांमध्ये व्याजदर खूपच कमी असतो. उदाहरणार्थ, चीनमध्ये मध्यवर्ती बँकेचा दर ३.१ टक्के, मलेशियामध्ये ३ टक्के, थायलंडमध्ये २ टक्के आणि व्हिएतनाममध्ये ४.५ टक्के आहे.

वस्त्र आणि कोळंबीसारख्या क्षेत्रांची परिस्थिती चांगली नाही. अमेरिकन खरेदीदारांनी ऑर्डर रद्द करण्यास सुरुवात केली आहे किंवा ऑर्डर रोखून ठेवत आहेत. येत्या काही महिन्यांत, याचा परिणाम भारताच्या अमेरिकेतील निर्यातीवर होऊ शकतो आणि निर्यातीत घट झाल्यामुळे, नोकऱ्या जाऊ शकतात आणि सरकारला आर्थिक प्रोत्साहन देणे कठीण होईल, असे ते म्हणाले.

### कापड, रत्ने, दागिने, कोळंबी, चामडे, पादत्राणे, रसायने, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल मशिनरी क्षेत्रांना बसणार फटका

या आठवड्यात जाहीर करण्यात आलेले २५ टक्के शुल्क ७ ऑगस्ट (भारतीय वेळेनुसार सकाळी ९.३० वाजता) पासून लागू होईल. हे शुल्क अमेरिकेतील सध्याच्या मानक आयात शुल्कापेक्षा जास्त असेल. या उच्च कराचा फटका ज्या क्षेत्रांना बसेल त्यात कापड/कपडे (१०.३ अब्ज), रत्ने आणि दागिने (१२ अब्ज), कोळंबी (२.२४ अब्ज डॉलर), चामडे आणि पादत्राणे (१.१८ अब्ज डॉलर), रसायने (२.३४ अब्ज डॉलर) आणि इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल मशिनरी (सुमारे ९ अब्ज डॉलर) यांचा समावेश आहे. भारताच्या चामडे आणि वस्त्र निर्यातीत अमेरिकेचा वाटा ३० टक्क्यांहून अधिक आहे.

### वस्तूंची निर्यात ३० टक्क्यांनी घसरली

थिंक टँक जीटीआरआयनुसार, तातडीने काढलेल्या अंदाजानुसार आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारताची वस्तूंची निर्यात गेल्या आर्थिक वर्षात ८६.५ अब्ज डॉलरवरून ३० टक्क्यांनी कमी होऊन अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचू शकते. २०२५-२६ मध्ये ६०.६ अब्ज डॉलरची गुंतवणूक झाली.

### तत्काळ हस्तक्षेपाची एईपीसी अध्यक्ष सुधीर शेखरी यांची सरकारला विनंती

एईपीसी (अपेरल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल)चे अध्यक्ष सुधीर शेखरी यांनी गेल्या आठवड्यात या मोठ्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी सरकारच्या तत्काळ हस्तक्षेपाची विनंती केली. निर्यातदारांना अडचणी येत आहेत आणि त्यांचे कारखाने चालू ठेवण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणात कपात टाळण्यासाठी त्यांना किमतीपेक्षा कमी किमतीत विक्री करावी लागेल, असे त्यांनी म्हटले आहे.



### भारताला प्रतिस्पर्धी देशांकडून तीव्र स्पर्धेचा सामना : अरविंद गोएंका

दिल्ली एनसीआर प्रदेशातील प्लास्टिक निर्यातदार अरविंद गोएंका म्हणाले की अमेरिकेला निर्यातीला प्रतिस्पर्धी देशांकडून तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागेल कारण भारतावरील कर सर्वात जास्त आहे. अमेरिकेने व्हिएतनाम (२० टक्के), थायलंड (१९ टक्के) आणि दक्षिण कोरिया (१५ टक्के) सारख्या देशांवर लक्षणीयरीत्या कमी कर निश्चित केले आहेत, जे सर्व प्लास्टिक वस्तूंच्या उत्पादनात उत्कृष्ट आहेत आणि ते भारताच्या वाटा कमी करू शकतात, जो सध्या दरवर्षी २.२ अब्ज डॉलर आहे, गोएंका म्हणाले. भारतातील आघाडीचे पादत्राणे निर्यातदार आणि फरीदा ग्रुपचे अध्यक्ष रफीक अहमद म्हणाले की, भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापार करार अंतिम होण्यापूर्वी सरकारने उद्योगाला मदत करण्यासाठी पुढे यावे.

## कुटूंब प्रमुख ..

नोकरीधंद्या निमित्ते
कायम राहिले बाहेर
इलाज नाही कसला
लांब दुरावले माहेर

बाबांनाऑफिस प्रिय
मुलांचा मिळे आहेर
कधी भेटी घडे तेंव्हा
उद्रेकचं उसळे बाहेर

रजासर्व वाया जाती
कामेधरून नाचे फेर
वाहूनघेतले कामाला
ना विचार करी फेर

बाहेर जगा वावरता
जसे जंगलामध्ये शेर
अडचणी क्षणी सोडे
रुबाबदार सव्वा शेर

कुटूंबात दाखल होई
निवृत्त झालो अखेर
मुले बोलती सडेतोड
आता झाली खूप देर

कुटूंब प्रमुख असूनि
झालो परिवाराबाहेर
झगडलो कुटुंबास्तव
सुरेख लाभला आहेर

**- हेमंत मुसरीफ पुणे .**

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मंडळ वारला येथे कार्यक्रम.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**



वाशिम:-तहसील मार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मंडळ वारला येथे वाशिम तहसीलमार्फत विविध प्रमाणपत्राचे वाटप व विविध महाराज स्व अभियाना अंतर्गत दाखले वाटप उत्पन्न सर्टिफिकेट डोमेसाईल प्रमाणपत्र तसेच लोककल्याणकारी योजना संजय गांधी निराधार योजना श्रावणबाळ वृद्धापकाळ योजनेच्या लाभार्थ्यांच्या फाईल बनवून त्यांना लाभ देण्यात व निवासी नायब तहसीलदार त्यांच्यामार्फत व मंडळ वारला अधिकारी आडे साहेब यांच्या सुद्धा मार्फत विविध प्रमाणपत्राचे वाटप या कार्यक्रमाचे अध्यक्ष. निवासी नायब तहसीलदार साहेबराव नप्ते. प्रमुख पाहुणे म्हणून सी.एस.आडे मंडळ अधिकारी वारला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कृषी अधिकारी अनिल जैताडे. (उज्वल मालेगाव वाशिम प्रतिनिधी. गजानन पवार पाटील सापळी.)ग्रामपंचायत वारला सरपंच सुरेश शिंदे. तसेच ग्राम महसूल अधिकारी सापळी (योगेश नागे.). ग्राम महसूल अधिकारी वारला बी एच आरू. ग्राम महसूल अधिकारी सावळी एस जे बोरकर. ग्राम महसूल अधिकारी जयपुर संगीता राऊत. तसेच वारला सहायक कृषी अधिकारी बी यु ठाकरे. सहाय्यक कृषी अधिकारी कृष्णा पंकज उलेमाले. तसेच महसूल सेवक कृष्णा दिगंबर राऊत. महसूल सेवक वारला शामसुंदर भडदमकर. महसूल सेवक वाई तुकाराम उमले. महसूल सेवक जयपुर कल्पना इंगोले. तसेच वारला मंडळ विविध खेड्यातील जनता उपस्थित होती व वारला ग्रामपंचायत सरपंच सदस्य व इतर गावकरी मंडळी ही या कार्यक्रमाला उपस्थित होती.

विशेष कृषी विभागाचे अनिल जैताडे साहेब यांनी शेतीविषयक खूप मोलाचे मार्गदर्शन केले.

## शेतक-यांनी डीसीएस मोबाईल अँपद्वारे स्वत : नोंदणी करावी

### ई -पीक पाहणीस सुरुवात,शेतकऱ्यांनी नोंदणी करून घेण्याचे तहसीलदार यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगावः-राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-पीक पाहणी प्रकल्पाअंतर्गत खरीप हंगाम 2025 साठी शेतकऱ्यांना स्वतःच्या 'मोबाईलवरून डीसीएस मोबाईल अप द्वारे पिकांची नोंदणी करण्यास सुरुवात झाली आहे.१ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत शेतकरी स्तरावरील पीक पाहणीसाठी ही सुविधा उपलब्ध राहणार आहे. विहित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन राळेगाव महसूल विभागाचे वतीने करण्यात आले.२०२१ पासून सुरू असलेल्या या प्रकल्पात केंद्र



शासनाच्या निर्देशानुसार सुधारणा करण्यात आली असून, रब्बी २०२४ पासून डिजिटल कॉप सर्वे प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात आली आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी डीसीएस मोबाईल अपचे ४.०.० अद्ययावत व्हर्जन गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून,सर्व शेतकर्यांनी ते अपडेट करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकर्यांनी सहाय्यकांवर अवलंबून न राहता शक्य तितकी पीक पाहणी स्वतः करावी,असे आवाहन शासनाने केले असून,अडचणी आल्यास गावातील पीक पाहणी सहाय्यकांची तसेच तलाठी यांची मदत घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

शासनाच्या उद्दिष्टानुसार शेती व्यवहारात पारदर्शकता व अचूकता निर्माण करण्यासाठी ई-पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची असून,सर्व शेतकरी बांधवांनी शासनाच्या विहित मुदतीत खरीप हंगाम २०२५ साठी पीक पाहणी प्रक्रिया पूर्ण करावी,असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

अग्रीस्ट्रेक अंतर्गत सरकारी योजनांचा लाभ व विविध अनुदान, प्रधानमंत्री पीक विमा योजना लाभ, पीककर्ज सुविधा, किमान आधारभूत हमीभाव विक्री व नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई या सह शेतकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध होण्याकरिता ई -पीक पाहणी ( DCS) महत्वाची ठरणार आहे. 'आपला सहयोग आपल्या उज्वल भविष्यासाठी' हे शासनाचे धोरण असून या करीता प्रत्येक शेतकरी बांधवानी नोंदणी करणे अत्यावश्यक आहे. राळेगाव महसूल प्रशासनाच्या वतीने या बाबतीत जाणीव जागृती व नियोजन करण्यात आले. तालुक्यातील शेतकऱ्यांनी १ ऑगस्ट पासुन सुरु झालेल्या ई - पीक पाहणीत ७/१२ वर पिकांची नोंद करून घ्यावी.

**-अमित भोईटे**
**तहसीलदार, राळेगाव**

# कार्यकर्त्यांना बळ देणारे नेतृत्व - आ. प्रशांत दादा ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



आमदार प्रशांत दादा ठाकूर आणि माझी ओळख मी कळंबोली चा भाजपाचा शहराध्यक्ष असताना झाली . एकदा शाळेमध्ये आधार कार्ड चे शिबिर आयोजित करण्यात आलेले होते . त्यावेळी आमदार प्रशांत दादा ठाकूर हे काँग्रेसमध्ये होते काँग्रेसचे कळंबोलीचे तेव्हाचे नेते सुदाम पाटील यांनी स्टेजवर माझी ओळख करून दिली . आणि तेव्हाच प्रशांत दादा म्हणाले तुम्ही जरी वेगळ्या पक्षात असला तरी हा शासकीय कार्यक्रम आहे तुम्ही पुढे या . आणि त्यानंतर अनेक वेळा आमची कार्यक्रमानिमित्त भेट झाली पुढे काही कारणास्तव मला भाजपा सोडून २०१३ ला शेका पक्षात जावे लागले . व २०१४ ला त्याचवेळी आमदार प्रशांत दादा ठाकूर यांचा भाजपमध्ये प्रवेश झाला . भाजपामध्ये आल्यानंतर आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी एका कार्यकर्त्यामार्फत मला निरोप पाठवला बबनराव तुम्ही भाजपाचे कट्टर कार्यकर्ते आहात आता आम्ही भाजपा मध्ये आलो आहोत आणि तुम्हाला आमच्याबरोबर काम करायचे आहे . तेव्हा आमदारकीची निवडणूक चालू होती . मी त्यांना सांगितले दादा हे इलेक्शन झाल्यानंतर मी तुमच्या सोबत येईल आणि निवडणूक झाल्यानंतर मी माझा शब्द खरा करून दाखवला . कारण माझा मूळ पिंडच भाजपचा असल्याने मी दुसऱ्या पक्षात काम करू शकत नव्हतो . मी परत भाजपामध्ये आल्यानंतर मला आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी पनवेल तालुका ओबीसी सेलचे तालुका उपाध्यक्ष केले त्यानंतर २०१७ साली महानगरपालिकेच्या निवडणुका लागल्या . आणि या निवडणुकीमध्ये प्रभाग आठ मधून माझ्या पत्नीला त्यांनी व लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांनी विश्वासाने निवडणुकीचे तिकीट दिले . मी निवडणूक लढवली व थोड्या मताने पराभव झाला परंतु कार्यकर्त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी लगेच फोन करून मला सांगितले तुम्ही थोड्या मताने हारला आहात . परंतु ही तुमची हार नाही हा तुमचा विजय आहे तुम्ही यापुढे जोमाने काम करा , व परत कामाला लागा . मी झालेला पराभव विसरून पक्षाचे काम जोमाने सुरू केले व लगेच दोन-तीन महिन्याने पक्षाच्या जिल्हा रचनेमध्ये आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी मला भाजपा भटके विमुक्त आघाडीचे रायगड जिल्हा अध्यक्ष पद दिले . परत तीन वर्षानंतर जेव्हा पक्षाची रचना बदलली म्हणजे रायगडचे दोन भाग झाले त्यानंतर सुद्धा पुढील दोन वेळेस मला उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी नियुक्त केले आहे . कारण त्यांनी माझ्यातले नेतृत्व गुण हेरले होते . मी सुद्धा आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवला माझ्या वर सोपवलेली जबाबदारी इमानेइतबारे पार पाडली . त्यामुळे त्यांची आणि आमची मैत्री तर घट्ट झालीच परंतु राजकारणापलीकडे एक नातं निर्माण झालं . आणि ते नातं विश्वासाचं होतं व आहे . जेव्हा जेव्हा मी आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्याकडे काम घेऊन गेलो तेव्हा तेव्हा त्यांनी ते काम करून दिले जी काम घेऊन गेलो ती कामं जनतेची व सर्व सामान्य लोकांची होती , त्यामुळे कधीही मला अडचण आली नाही . कार्यकर्त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या आमच्या या नेत्याचा वाढदिवस म्हणजे गोरगरिबांसाठी एक पर्वणी असते . कारण यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण जिल्हाभर आम्ही सर्व कार्यकर्ते आरोग्य शिबिरे व इतर समाज उपयोगी कार्यक्रम राबवत असतो . आणि याचा फायदा गोरगरीब जनतेला होत असतो. लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शिकवण व आमदार प्रशांत दादा ठाकूर यांचे बळ नेहमीच कार्यकर्त्यांना मिळत असते . म्हणून अशा नेत्यांवर प्रेम करणारी जनता सुद्धा खूप मोठी आहे . त्यामुळे पुन्हा एकदा आमदार प्रशांत दादा ठाकूर यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा भगवान बाबा व वामन भाऊ महाराज आमच्या या लाडक्या नेत्याला उदंड आयुष्य देवो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना .

## ढाणकी नगर पंचायत व कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशन पुणे यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अभियान

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**

नागरी २.० अंतर्गत दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविकाअंतर्गत स्थापन केलेल्या महिला बचत गटातील एकूण ५५ महिलांचे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते...

या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये महिलांना उपजीविकेकरिता सुका कचरा प्रक्रिया केंद्र चालवणे, पुनर्वापर योग्य बस्तु कचऱ्यात न जाऊ देता त्याचे वेगळे संकलन करून दुरुस्ती व विक्री करणे, इ-कचरा चालवणे, कपडयांच्या कचऱ्याचा पुनर्वापर, बांधकामाच्या राडारोड्यावर प्रक्रिया व उत्पादन, खतनर्मिती (कंपोस्टिंग बायोगॅस), फुलांच्या निर्माल्यापासून वापरलेल्या फुलांपासून अगरबत्ती बनविणे व जुन्या कपड्यांपासून विविध प्रकारचे पॉकेट, पर्स, पिशव्या बनाविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. व्यवसाय विषयक मार्गदर्शन व बाजारपेठ कशी उपलब्ध करता येईल,

याबाबत माहिती देण्यात आली. नगरपंचायत ढाणकी येथे मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयिन अधीक्षक बावलगावे सर, स्वच्छता निरीक्षक श्रीवास्तव सर, आणि शहर समन्वयक अढागळे सर तसेच कुशाग्र फाउंडेशन पुणेचे प्रकाश जोगदंड सर, प्रफुल गायकवाड सर आदी उपस्थित होते ..आणि यांनी. मार्गदर्शन केले. ही



व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले.

एकदिवसीय कार्यशाळा यशस्वीतेसाठी पार पडली. त्याच बरोबर संस्कार बहुउद्देशीय संस्था चे अध्यक्ष उपस्थित होते.